# साजरी आणि साजऱ्या

## लेखक : डॉ. रवीन् थत्ते

“बर का जावई बापू आमची मुलगी मोठी साजरी आहे” हे वाक्य ऐकून आता लवकरच साठ वर्षे होतील . ती मुलगी म्हणजे माझी भावी बायको किंवा संस्कृतमध्ये पत्नी आणि ते वाक्य त्या मुलीच्या एका नातेवाईकाने माझ्या लग्नाच्या आदल्या दिवशीच्या रुख्वताच्या वेळी मला सुनावले होते . “सुनावले होते” हा शब्दप्रयोग आपल्या कडच्या मुलीची धीटपणे भलामण केली जात होती ह्या अर्थाने वापरत आहे . तो काळ निराळा होता. जावयाला अरे तुरे म्हणण्याची पद्धत नव्हती आणि म्हणून त्या वाक्यात माझ्यासाठी “जावई बापू” हे बिरूद वापरले गेले होते . लवकरच माझ्या लग्नाला साठ वर्षे पुरी होतील. अर्थात “माझे लग्न” हा शब्दप्रयोग चुकीचा कसा आणि लग्न दोघांचे असते हे मला त्या मुलीनेच नंतर वारंवार सुनावले आहे. खंडीभर लिहितोस आणि भाषणे देतोस बायकोबद्दल कधी लिहिणार अशी कुणकुण सध्या मनामधे “इंद्रिया नेणता भोगिजे” ह्या तऱ्हेने उमटत आहे. साठ वर्षाच्या सहवासाचे ते एक फळ आहे म्हणून हा लेख

मुळात साजरी हा शब्द मराठीत सापडत नाही. “साजरा” असा पुल्लिंगी शब्द मात्र आहे तो शब्द संस्कृत मधल्या “सज्ज” ह्या शब्दातून आला आहे आणि त्याचा अर्थ “तयार” असा आहे परंतु तो ‘तयार’ शब्द फारसी आहे . ते काहीही असो मी सज्ज होतो हे नक्की . ह्याचे कारण मी तिला आधीच हेरली होती . सडसडीत बांधा खूप लांब केस आणि बोलके डोळेआणि थोडेसे पोपटी पण छान नाक असलेल्या तिने माझ्या मनात आधीच प्रवेश केला होताच . आमच्या दोघांचे वडील एकमेकांचे मित्र होते त्यांचा तिसरा मित्र लग्न जुळवत असे आणि अशा तऱ्हेने लग्नाचा शब्द आल्यानंतर मी त्या गावचाच नाही अशी बतावणी केली असली तरी गुढग्यावरचे बाशिंग डोक्यावर कधी पोहोचते ह्याची वाट बघत होतो. तिच्या दोन अटी होत्या. एक अशी की मला चष्मा असलेला नवरा नको आणि दुसरी मला मुंबईतला नवरा हवा . मला चष्मा नव्हता आणि मी मुंबईत व्यवसाय करणार की नाही या प्रश्नाचे उत्तर ‘बघू’ ह्या सावध आणि संदिग्ध शब्दांनी मी परतवले होते. पण ते वयच असे असते (मी चोवीस आणि ती वीस) की ह्या प्रश्नोत्तरांना तसा काही अर्थ नसतो. कारण तो खेळ रसायानांचा असतो . त्याकाळचे तिचे वाक्य होते की “मी तुला बघितले आणि तुझ्या प्रेमात पडले”.अर्थात काळ सरत गेला तसे ते वाक्य थोडे लांबले आहे “तुझ्या प्रेमात पडले आणि चुकलेच ” असे ते वाक्य आहे. पण ते नवे वाक्य फारसे गंभीरपणे घेण्यात काही अर्थ नसतो असे मला माझा अनुभव सांगतो. शेवटी “प्रेमात पडणे” ह्या वाक्प्रयोगातला पडणे हा शब्द पतन दाखवतो आणि शेवटी ते चुकणेच असते आणि पतन कोणाला आवडते ? परंतु संसार म्हणजे काहे स्वर्ग नव्हे किंवा मोक्ष तर नव्हेच नव्हे तेव्हा पतन स्वीकारतच संसार करावा लागतो ही समज ज्या काळात रूढ आणि दृढ होती त्याकाळचे आमचे लग्न मी प्रचंड उपद्व्यापी असून मस्तपणे टिकले हे खरेच आणि ते मुख्यत: तिच्यामुळेच . साजरी शब्दाबद्दल नंतर सांगतो .

दोन व्यक्तींमध्ये किती विरोधाभास असावा ह्याचे उत्तम उदाहरण म्हणजे आम्ही दोघे. तिच्यावरचे संस्कार विदर्भीय थेट चंद्रपूरचे आणि आम्ही चिपळूण मार्गे पुणेवाले. लोणचे वाढतांना फोड वाढू की रस असली भन्नाट वाक्ये आमच्यात रूढ होती . तिच्या घरी पाहुण्यांची वर्दळ आणि गर्दळ आणि जेवणे तर भरपूर परंतु सबंध दिवस चहाच्या आधणाचे भांडे चुलीवरून खाली उतरत नसे. आमच्यात नैतिकता, तत्वभेद, संघर्ष, समाजवाद चळवळ ह्याचा दिवसभर उहापोह चाले. जणू काही चिंता करतो विश्वाची तसे. तर हिचे ब्रीदवाक्य होते “कशाला उद्याची बात , बघ सरून चालली रात “. हिने कला शाखेची पदवी घेतांना तत्त्वज्ञान हा विषय घेतला होता किंवा तिला घ्यावा लागला होता. तो विषय मला वाटते केवळ पदवी मिळवण्यासाठीच तिने वापरला असावा.आमच्या आयुष्याच्या एका वळणावर माझ्या शिक्षणाची शाखा विज्ञान असूनही

मी भारतीय तत्वज्ञानाकडे वळलो. तेव्हापासून “आयुष्य जगायला तत्वज्ञानाची गरजच काय” असा मोठा भेदक प्रश्न तिने मला शेकडो वेळा विचारला असेल. प्रपंचाचे ज्ञान ते विज्ञान हे जर खरे असेल तर ती एक अस्सल वैज्ञानिक होती असेच म्हणावे लागेल कारण ती प्रपंचात पारंगत होती . आणि शिवाय प्रपंचातले माहेर आणि सासर हे आदिम द्वैत पार करून ती लीलया अद्वैताकडे पोहोचली म्हणून तीच खरी तत्वज्ञानी. “तुझ्याच नातेवाइकांना विचार आपल्या दोघांमध्ये कोणाचा स्वभाव चांगला आहे ते” हा तिचा आणखी एक ठेवणीतला प्रश्न .आदिम काळापासून बायका त्यांच्यातल्या संप्रेरकांमुळे मोठ्या धोरणी ठरल्या आहेत . प्रपंच्याच्या पटावर आपले मोहरे कसे कधी हलवावे ह्याची त्यांना अचूक जाण असते म्हणूनच थोडी सवड मिळाल्यावर माहेरच्या माणसांनी थोपवलेले तिचे “आपण स्वतंत्रपणे काहीतरी केले पाहिजे” ह्या विचाराचे मोहरे तिने अलगद पुढे ढकलले. आणि माझी पंचाईत झाली . ह्याचे कारण पन्नास एक वर्षे आधी माझ्या आईने असेच काहीतरी केले होते . मी गप्प बसलो. “मौनं संमति लक्षण “ ह्या वचनाचा आधार घेत तिने कारवाई सुरु केली . एक विषय निवडला त्यात प्रशिक्षण घेतले आणि ते झाल्यावर छोट्यामोठ्या नोकऱ्या करत राहिली .त्यात तिची थोडी ससेहोलपट झाली पण ती डगमगल्याचे जाणवले नाही. पुढे तिचा हसतमुख प्रसन्न चेहरा आणि लोकसंग्रह करण्याचा स्वभाव आणि हजरजबाबी वृत्ती ह्यामुळे “कर्माचे फळ मिळतेच मिळते” ह्या न्यायाने तिला एक मोठी नोकरी चालून आली ती तिने स्वीकारली त्याचे चीज केले आणि त्याच संस्थेत ती विश्वस्त झाली. साजरा ह्या शब्दाचा एक अर्थ शोभिवंत असा आहे. मी गबाळा नाही परंतु कपडे कसेही घातले तरी मी प्रभाव पाडू शकतो अशी मला घमेंड आहे . ह्या बाबतीतही आमच्यात साम्य नाही . प्रसंगानुरूप आणि सणासुदीला वेशभूषा करणे ह्यात कमीपणा नाही त्याला फ्याशन म्हणणे चुकीचे आहे असे तिचे आणखी एक ब्रीद वाक्य आहे .

असे होत होत काळ गेला आणि ती आता ऐशी झाली. संसारात येतात तशी दु:खे तर आलीच काही डोंगरा एवढी होती आणि स्त्रीसुलभ स्वभावाला अतिशय क्लेश होतील अशी होती पण तिथेही तिने नवऱ्याला म्हणजे मला त्रास होणार नाही ह्या रीतीने ती स्वतः झेलली . ती जणू जन्मतः सज्ज होती आणि म्हणून शब्दकोषात नसलेला आमच्या लग्नात तिच्या बद्दल वापरलेला साजरी हा शब्द तिला चपखल आणि यथार्थ ठरला. हे सगळे मुद्दामच लिहिले कारण अशा अनेक साजऱ्या बायका होत्या आहेत आणि होतीलही त्यांचेही कौतुक झाले पाहिजे असे मला वाटले म्हणून हा लेख लिहिला

एक अनामिक नवरा